लोकमत

# किरण गुरव यांना पीएचडी.

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्यिक किरण अनंत गुरव यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली.



गुरव यांनी 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयावर मानव्यविद्या विद्याशाखेतून विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. त्यांना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांचे सहकार्य लाभले. गुरव यांचे राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी, बाळूच्या अवस्थांतराची डायरी आणि क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह आणि जुगाड ही कादंबरी प्रसिद्ध आहे.

पुढारी

# विद्यापीठात संत जगनाडे महाराजांची जयंती

कोल्हापूर : (पुढारी वृत्तसेवा) : संत संताजी जगनाडे यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्यासह विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

पुढारी

# किरण गुरव यांना पीएच.डी.



**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्यिक किरण गुरव यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. जाहीर झाली. गुरव यांनी 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयावर मानव्यविद्या विद्याशाखेतून विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. गुरव यांचे राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी, बाळूच्या अवस्थांतराची डायरी, क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या जुगाड कादंबरीचा शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांचे सहकार्य तर कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी

# न्यू कॉलेजमध्ये बिंदुनामावली तपासणी शिबिर

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** राज्य शासनाने महाविद्यालयातील शिक्षक भरतीचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने महाविद्यालयातील शिक्षकपदांच्या भरती प्रक्रियेसाठी न्यू कॉलेजमध्ये बिंदुनामावली तपासणी शिबिर झाले. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करून घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षाकडून एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार न्यू कॉलेजमध्ये हे तपासणी शिबिर झाले, अशी माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात संत जगनाडे महाराज जयंती

**कोल्हापूर :** संत संताजी जगनाडे यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. संत तुकाराम महाराज यांचे शिष्य असलेले आणि त्यांचे टाळकरी व लेखनिक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेल्या संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्यासह आर. व्ही. गुरव, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

10 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘घुंगरू’ कादंबरीचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ९ : गणपत हरी पाटील लिखित ‘घुंगरू’ या दुसऱ्या कादंबरीचे प्रकाशन नुकतेच येथे झाले. धावपळीच्या व ताण-तणावाच्या पोलिस सेवेत असूनही पाटील यांनी जोपासलेला हा लेखनाचा छंद कौतुकास्पद आहे, असे या वेळी गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस अधीक्षक डॉ. दिनेश बारी यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी या कादंबरीतून अस्सल

## » सांस्कृतिक कोल्हापूर



कोल्हापूर : गणपत पाटील लिखित ‘घुंगरू‘ कादंबरीच्या प्रकाशनावेळी डॉ. दिनेश बारी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सतीश घाळी, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे.

मराठी बाज, ग्रामीण संस्कृती पुरेपूर प्रतिबिंबित झाल्याचे मत व्यक्त केले. गडहिंग्लजच्या विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी, न्यू एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य प्रभाकर हेरवाडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

वाचनकट्टा संस्थेचे युवराज कदम यांनी स्वागत केले. वनिता कदम यांनी प्रास्ताविक केले. सीमा मकोटे यांनी सूत्रसंचालन केले. ओंकार कागीणकर यांनी आभार मानले. यावेळी बाजीराव पाटील, अमित पाटील, गुलमर्ग सोसायटीचे राजू सुळेगावकर, क्रीडा शिक्षक एस. सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

10 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ आंतर विभागीय कबड्डीचे शाहू महाविद्यालयास विजेतेपद

## इचलकरंजी नाईट कॉलेज व्दितीय

इचलकरंजी, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरच्या शाहू कॉलेजने विजेतेपदाची परंपरा कायम राखली. अंतिम सामन्यात त्यांनी इचलकरंजीच्या नाईट कॉलेजला तब्बल १३ गुणांनी पराभूत केले. तेजस पाटील आक्रमक चढाया सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय तिसरे तर के.बी. पी. कॉलेज (इस्लामपूर) चौथे आले. स्पर्धेतून अमरावती येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड केली जाणार आहे.

नाईट कॉलेजतर्फे जय हिंद मंडळाच्या मैदानावर स्पर्धा झाली. त्यात सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील पहिल्या चार क्रमांकाचे एकूण १२ संघ सहभागी झाले होते. साखळी पध्दतीने एकूण १९ सामने दिवस-रात्र अशा दोन सत्रात प्रो-कबड्डी नियमानुसार मॅटवर झाले.

अंतिम फेरीत मध्यंतरापर्यंत शाहू कॉलेजने नाईट कॉलेजवर नऊ गुणांची आघाडी घेतली होती.



इचलकरंजी : आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविणारा शाहू कॉलेजचा संघ पाहुण्यांकडून चषक स्वीकारताना.

तेजस पाटीलच्या वेगवान चढाया व बचावपटूचे उत्कृष्ट रक्षण यांच्या बळावर ही आघाडी वाढतच गेली. नाईट कॉलेजचा इरशाद खाटिकचे प्रयत्न अपुरे पडले. शाहू कॉलेजने १३ गुणांच्या फरकाने सामना जिंकत विजेतेपद पटकावले. दरम्यान, उपांत्य फेरीत शाहू कॉलेजने वारणा कॉलेजवर १० गुणांनी मात केली. दुसरा सामना चुरशीने झाला. नाईट कॉलेजने (३४ गुण) के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर (३२ गुण) विरुद्ध अवघ्या दोन गुणांनी मात केली. तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत वारणा महाविद्यालयाने के. बी. पी. कॉलेजवर १७ गुणांनी विजय मिळवली.

देशभक्त बा. भा. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणराव खंजिरे, विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, बाळासाहेब मूरदंडे, प्रकाश रावळ, संजय घायतिडक आदींच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. यावेळी सत्यनारायण डाळ्या, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव संभाजी पाटील, कार्याध्यक्ष रमेश भेंडीगिरी, शेखर पाटील उपस्थित होते.

10 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


epaper : www.sindhudurgsamachar.com

# सिंधुदुर्ग समाचार

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

कोल्हापूर


# किरण गुरव यांना पीएच.डी.



कोल्हापूर/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्यिक किरण अनंत गुरव यांना आज शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली.

श्री. गुरव यांनी साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास या विषयावर मानव्यविद्या विद्याशाखेतून विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यांना मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. नंदकुमार मोरे यांचे सहकार्य, तर कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन लाभले.

श्री. गुरव यांचे राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी, बाळूच्या अवस्थांतराची डायरी आणि क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह आणि जुगाड ही कादंबरी प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्यकृतींना महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका), महाराष्ट्र शासनाचा ग.ल. ठोकळ पुरस्कार तसेच ह. ना. आपटे पुरस्कार, मुंबई साहित्य संघाचा कथाकार शांताराम पुरस्कार, मॅजेस्टिक प्रकाशनाचा सुभाष भेंडे पुरस्कार, शब्द प्रकाशनाचा बाबूराव बागुल पुरस्कार, पद्मश्री विठ्ठलराव विखे पुरस्कार (प्रवरानगर), भि.ग. रोहमारे पुरस्कार (कोपरगाव), रेंदाळकर स्मृती पुरस्कार (हुपरी), मराठवाडा साहित्य परिषदेचा बी. रघुनाथ पुरस्कार आणि कांताबाई व भंवरलाल जैन फाऊंडेशन (जळगाव) यांचा निसर्गकवी ना.धों. महानोर पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या जुगाड या कादंबरीचा शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमात समावेश झाला असून अनेक कथांचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश आहे.

तरुण भारत

# किरण गुरव यांना पीएच. डी. पदवी जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्यिक किरण गुरव यांना शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाची पीएच. डी. पदवी जाहीर करण्यात आली. गुरव यांनी 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा



मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे मार्गदर्शन तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन लाभले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांचे सहकार्य लाभले. गुरव यांचे राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी, बाळूच्या अवस्थांतराची डायरी आणि क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह आणि जुगाड ही कादंबरी प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्यकृतींना महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका), महाराष्ट्र शासनाचा ग. ल. ठोकळ पुरस्कार तसेच ह. ना. आपटे पुरस्कार, मुंबई साहित्य संघाचा कथाकार शांताराम पुरस्कार, मॅजेस्टिक प्रकाशनाचा सुभाष भेंडे पुरस्कार, यासह विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या जुगाड या कादंबरीचा शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमात समावेश आहे.

10 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत शाहू कॉलेजला जेतेपद

## शिवाजी विद्यापीठ पुरुष आंतर विभागीय कबड्डी स्पर्धा : इचलकरंजीच्या नाईट कॉलेजला उपजेतेपद, वारणा कॉलेजला तृतीय क्रमांक

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठ पुरुष आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरच्या शाहू कॉलेजने नाईट कॉलेज इचलकरंजी संघाचा पराभव करीत अजिंक्यपद पट्‌काविले. येथील जय हिंद मंडळाच्या क्रीडांगणावर झालेल्या या सामन्यात कोल्हापूर सांगली आणि सातारा जिल्ह्यातील बारा संघ सहभागी झाले होते.

तृतीय क्रमांकाच्या साठी झालेल्या सामन्यात वारणा कॉलेजने ४१ विरुध्द २४ गुणानी इस्लामपूर संघाचा पराभव केला. येथील देशभक्त बा. भा. खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व रोटरी क्लबच्या वतीने आयोजित या स्पर्धेचा बक्षीस समारंभ खंजिरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुण खंजीरे, रोटरीचे अध्यक्ष प्रकाश रावळ शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ पी.टी. गायकवाड यांच्या हस्ते झाले.





इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ पुरुष आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेत विजेत्या शाहू कॉलेजला चषक देताना अरुण खंजिरे, डॉ पी. टी. गायकवाड, प्रकाश रावळ, ,संजय घायतीडक, नेमिनाथ कोथळे, राहुल खंजिरे. तर दुसऱ्या छायाचित्रात उपविजेत्या नाईट कॉलेज संघास चषक देताना प्रकाश रावळ.

उपांत्य सामन्यात शाहू कॉलेजने वारणा महाविद्यालयाचा २८ विरुद्ध १८ गुणांनी पराभव केला तर इचलकरंजीच्या नाईट कॉलेजने इस्लामपूर कॉलेजचा ३४ विरुद्ध ३२ गुणाने मात करीत अंतिम फेरीत धडक मारली.

स्पर्धेतून निवड झालेले खेळाडू अमरावती येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. सदर संघ निवडण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचे चेअरमन म्हणून प्रा. आयुब कच्छी यांनी तर सदस्य म्हणून प्रा. विक्रम नांगरे–पाटील व प्रा. डॉ. देवेंद्र बिरनाळे यांनी काम पाहिले तर निरीक्षक म्हणून प्रा संजय पाटील यांची नेमणूक करण्यात आली होती. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी संजय घायतीडक, नेमिनाथ कोथळे, वसंत पाटील, नागनाथ बसूदे, शरद देसाई, राहुल खंजिरे, पुंडलिक जाधव उपस्थित होते.

### शाहू कॉलेजची धमाकेदार कामगिरी

अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या शाहू कॉलेजने पहिल्यापासूनच आघाडी घेतली होती. पहिल्या फेरीत सोळा १६ विरुद्ध ७ मिळून या कॉलेजने आपल्या भक्कम खेळीचे दर्शन घडविले. शाहूच्या तेजस पाटील यांनी केलेल्या वेगवान चढाया व बचाव पटूचे उत्कृष्ट रक्षण याच्या बळावर ही आघाडी वाढत गेली. शाहूच्या आक्रमकतेपुढे नाईट कॉलेजचा खेळाडू परवेज खाटीक, नदीम शेख, निखिल जाधव यांचे प्रयत्न अपुरे पडले. दुसऱ्या डावात नाईट कॉलेजने आघाडी घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली मात्र त्यांना यश आलेच नाही. दुसऱ्या डावातही शाहू कॉलेजची आघाडी कायम राहिली. शाहू कॉलेजने इचलकरंजीच्या नाईट कॉलेजचा ३० विरुद्ध १७ गुणांनी पराभव करून विजेतेपद पटकावले.